(Marathi)

1026/9/91

1357 9 P

# दे. भगतसिंग

1357 1357



## देशाला दान जिवाचें

किंमत १ आणा

16 FEB 1932
DEPARTMENT

# दे. शिवराम हरि

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1357
Date
GOVT. OF INDIA

# राजगुरु



**मुद्रकः-पी. बी. पाठक**

श्रीपांडुरंग वैभव प्रेस सूर्यमहाल गिरगांव मुंबई नं. ४

# दे॰ भगतसिंग राजगुरु व सुखदेव.

## देशाला दान जिवाचें

[ कवि—श्रीयुत मनमोहन ]

( चाल—उद्धवा शांतवन कर जा० )

चढविला सिंग तो फाशीं हृदयांत उठे काहूर ।
सुखदेव—गुरूंला फांशीं डोळ्यांचा बदले नूर ।
नकळे ही क्रान्तीदेवी किती असे बळी घेणार ।
परि हें प्राणांचें दान ।
देईल नवें चैतन्य ।
ठरवील हिंदला धन्य ।
म्हणउनी अशा तरुणाचें देशाला दान जिवाचें ॥१॥
वीर ना असिलता सोडी शत्रूंच्या जंजाळानें ।
सत्यातें टाकि न साधू स्वार्थाच्या वाग्जाळानें ।
पृथ्वीला शेष न ढाळी प्रळयाच्या कल्लोळानें ।
क्रान्तीचा भक्त श्रीदाला ।
सोडी न धीर वृत्तीला ।
जरि फांस गळ्यांशी भिडला ।

शिर सदा करतळीं ज्यांचें । देशाला दान जिवाचें ॥२॥

'विश्वास' पराजित झाला तो वीर नव्हे कीं काय ?
बंडांत पराजित 'राणी' ती शूर नव्हे कीं काय !।
उलटला डाव युद्धांचा 'सिंहाचा' मग निरुपाय ।
शेवटच्या संगरकाळीं ।
फ्रान्सचा 'सिंह' ये जाळीं ।
विधिघटना जेथ निराळी ।
अपजयीं जयश्री नाचे । देशाला दान जिवाचें ॥ ३ ॥

स्वर्गंगा स्वातंत्र्याची आणण्या झटे तो वाली ।
निजदेश हिताचे साठीं कृष्णासम संकट झेली ।
तारुण्यशक्तिपा अंगी डोळ्यांतील जादु निराळी ।
आभिमन्यु आवेशाचा ।
संभाजी निर्धाराचा ।
प्रिय बाळ हिन्दमातेचा ।
क्रांतिचा ध्वज हातीं नाचे देशाला दान जिवाचे ॥५॥


हा भरतखंड शिवजीचा वीरांचा बनला भाट ।
हा भरतखंड बजीचा क्रान्तीची पाही वाट ।
ती साध्य कराया सठीं भोगीती हाल ते धीट ।

वर्जिलें अन्न त्र्यमास ।
शरिरांचे झडलेंमांस ।
मृत्युचा घेतला ध्यास ।
झिटकारुनि भोग सुखाचे देशाला दान जिवाचें ॥५॥

निशस्त्र अहिंसावादी झुरतात स्वराज्यासाठीं ।
ईर्षेने हिंसावादी फांसाच्या घेती भेटी ।
हे दोन विरोधी पंथ एकाच मुक्तिच्या पोटी ।
व्यक्तीचा स्वार्थ न त्यांत ।
देवांच्या दरबारांत ।
कोण धन्यंतर ठरतात ? ।
हृदयंगम चित्र कुणाचें ! । देशाला दान जिवाचें ॥६॥

रक्ताचें करितें पाणी वार्ता ती तन्मरणाची ।
अंधारी डोळ्या आणीवार्ताही तद्दहनाची ।
शोकाकुल झालीं सारीं लेकरें भरतभूमीची ।
परि त्यांचें धैर्य न गळले ।
मन त्याचें किमपि न चळलें ।
देशाचें प्रेम न ढळलें ।
त्या तीन शिलेदारांचें । देशाला दान जिवाचें ॥७॥

"केसरी" मंगळवार ता. २१-४-३१



# । झंडा ऊंचा रहे हमारा ।

## विक्रीस तयार.

सुंदर फॅन्सी चित्रांचें कार्ड, देवाची, साधुसंतांची, नामांकित देशभक्त पुढारी व सुंदर स्त्रियांची अशी हर-प्रकारची रंगीन कार्डे छापून तैयार केली आहेत व्यापारी भाव दरशेकडा १० आणे पोष्ट खर्च २ आणे. पोष्ट खर्चासह तिकीटें अगाऊ पाठविणें व्ही. पी. नें मागवू नयें. व्ही. नें माल पाठविला जाणार नाहीं पोष्ट खर्चासह अगाऊं किंमत पाठवावी.

### पी. बी. पाठक महात्मा एजन्सी

गिरगांव रेल्वे बुकिंग व पार्सल ऑफिसचे वर मुं. ४

विक्रीस तयार.

# बाबू गेनू झिंदाबाद

## बाबू गेनूचा पोवाडा मराठी.

## बाबू गेनूचे चरित्र ( मराठी )

## बाबू गेनूचें चरित्र. ( गुजराथी )

सुंदर चित्रासह किंमत प्रत्येकी एक आणा.

व्यापारी दर शेकडा ३ रुपये हजारी २५ रुपये.

बाबू गेनू संगीत पत्रिका साधी एक पैसा शेकडा १ रु.आ.

बाबू गेनू संगीत पत्रिका तिनरंगी सचित्र

किंमत २ पैसे शेकडा १ रुपाया

पोष्ट व्ही. पी. खर्च वेगळा.

किरकोळ मागविणारांनीं पोष्ट खर्चासह किमततीची तिकीटें अगाऊ पाठवून मागणी करावी.

**पी. बी. पाठक आणि कंपनी**

**महात्मा एजन्सी सूर्यमहाल गिरगांव मुंबई नं. ४**

# महात्मा गांधी.



पी. बी. पाठक आणि कंपनी मुंबई नं. ४